# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक

**दिनांक ०८.०९.२०१७**

मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु विक्री करणारे तसेच अंमली पदार्थाची तस्करी तसेच मटका जुगार विक्रि करणा-या इसमांवर आळा घालण्याकरीता अवैध दारु रेड तसेच अंमली पदार्थ रेड संबधाने स्थानिक गुन्हे शाखा येथील अधिकारी /कर्मचारी यांचेवर सोपविलेली जबाबदारी पार पाडतांना मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे आदेशान्वये मा. महेंद्र पंडीत अतिरिक्त पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदिप लांडे, सोबत सफौ/६२६ खुशाल गेडाम, सफौ/७८७ दादाजी करकाडे पोहवा/१४९२ भाऊराव बोरकर पोना/३०९२ दुधराम चवारे मपोशि/६०३८ वृषाली चव्हाण, फोटोग्राफर पोना/३३६३ पंकज भगत, चापोना/९३३ चंदु मोहुर्ले, चापोहवा/१८४३ कालीपद मंडल अशा पोलीस पथकाने गोपनिय बातमीदार लावुन त्याचे माध्यमाने पोलीस स्टेशन चामोर्शी हद्दितील मौजा जयनगर येथील गांजा विक्रेता नामे विजय ठाकुरदास मंडल याचे संबधात खात्रीशीर माहिती घेवुन आप-आपले अस्तीस्तव लपवुन योग्य प्रकारे सापळा रचुन गोपनिय सुत्राकडुन मिळालेल्या माहितीचे आधारे दोन शासकिय पंचाना सोबत घेवुन नमुद इसमाचे राहाते घरी पोहचुन गांजा (अंमली पदार्थ) संबधाने झडती घेतली असता, त्याचे ताब्यात १ किलो ४६ ग्रॅम वजनाचा गांजा तसेच गांजा विक्रीपोटि त्याचे ताब्यात एकुन ९२५०/- रुपये मिळुन आले. त्याचे ताब्यात मिळुन आलेला गांजा घटनास्थळावरुन जप्ती करुन त्याचे विरुध्द कायदेशिर कारवाई होणेस पोलीस स्टेशन चामोर्शी येथे लेखी तक्रार देवुन एन.डी.पी.एस ॲक्ट चे कलम २० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. अभिनव देशमुख पोलीस अधिक्षक, गडचिरोली तसेच महेंद्र पंडीत अपर पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रदिप लांडे, सोबत सफौ/६२६ खुशाल गेडाम, सफौ/७८७ दादाजी करकाडे पोहवा/१४९२ भाऊराव बोरकर पोना/३०९२ दुधराम चवारे मपोशि/६०३८ वृषाली चव्हाण, फोटोग्राफर पोना/३३६३ पंकज भगत, चापोना/९३३ चंदु मोहुर्ले, चापोहवा/१८४३ कालीपद मंडल यांनी केली आहे.

गडचिरोली जिल्हयातील बेकायदेशिर गांजा वाहतुक करणारे तसेच अवैध विक्री करणा-या इसमांवर अंकुश घालुन गांजा (अंमली पदार्थ) विक्रि करण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखेनी कंबर कसली असल्याने जिल्हयातील अशा प्रकारचे तस्कर व विक्रेते हे धास्तावलेले आहेत.